॥ज्योतिर्मय॥
साहित्याचे विद्यापीठ

कवितेच्या लाटावर...



लुप्त चंद्र

भिजलेल्या दूर गावातुनी
एकली तृ वेशीवरी
धुक जड थंड आसमंती
छत्री फुलपाखरी

रस्ता लपुन संधी प्रकाशी
आरास दवं बिंदूंची
रूपेरी चंद्र समोरी लाजरा
बरसात चांदण्याची

लामण दीप दूर उंचावरी
मंद प्रकाश सरी
सावली व्याकूळ उमटली
धुसर गवतावरी

राखाडी ढगांचे गंधकोषी
गाव बसला लपून
आणा भाका घेतांना
कसे गेलो हरवून

भेट शेवटची सुटलं गाव
नाव मांगं ठवून
स्वप उरी घेऊन परतलो
मळभं आले भरून

एकाकी उभा माळरानी
भग्न हदयातून
छिन्न बिन्न क्षितिजावर
लुप्त चंद्र बघून

ऋतू बदलले वर्ष पालटली
शोधतो आठवणीतून
सनई हौघडा बेसूर झाला
मन मंदिरातून

प्रफुल्ल ठाकरे
अमरावती

रंग कोणता मनाचा..?

रंग कोणता मनाचा
कोणी सांगेल का मला?
हास्यामागे दडलेले दुःख,
दिसेल का कधी कुणाला?

कधी मायेचा पाऊस असतो
कधी आठवणींची सर असते
कधी शब्दांतला गोडवा असतो
कधी अबोल भावनांचा दरवळ असते....

मन कधी भावनाचे जाळे तर
कधी निळ्या आभाळासारखे
कधी लाल उत्कटतेचे प्रेमाचे
तर कधी शुभ्र निर्मळ पाण्यासारखे....

मन नात्यांच्या रंगांनी सजते
मग स्वनांची उधळण होते
दुःखाच्या सावलीतही कधी
आनंदाची पालवी फुटते....

मनाला नसतो एकच रंग
क्षणाक्षणाला बदलत राहतो
ज्याला जसं समजून घ्याल
तसतसा मनरंग खुलत जातो

रंग कोणता मनाचा? खर तर
हा प्रश्नच मला खूप आवडला
मन ओळखता आलं ज्याला
त्याच्या जीवनात रंग अधिक खुलला...

वसुधा वैभव नाईक,
पुणे.



राधा

श्यामनामाचा जप ओठी, श्वासही हरिनाम झाला,
राधेंच्या अंतःकरणी कृष्णच परमधाम झाला।
यमुना, कदंब, वृंदावन सारे साक्षी भावाचे,
एक बासरीचा सूर तिचा नित्य प्रणाम झाला।

नाही इच्छा वैभवाची, नाही स्वर्गसुखाची आशा,
चरणधूळीचा कण मिळता जीवनाचा राम झाला।
विरहाच्या ज्वालांमध्ये प्रेम अधिक उजळत गेले,
अश्रूंचा प्रत्येक थेंब भक्तीचा अभिषेक झाला।

कृष्ण गेले दूर तरीही दूर कधी ते नव्हते,
राधेंच्या निर्मळ चित्ती नित्य त्यांचा वास झाला।
"मीपणा"चा त्याग करून सर्वस्व त्यांना अर्पिले,
देह जरी राधेचा होता, आत्मा घनश्याम झाला।

उद्धवही थक्क होऊनी प्रेमभक्ती पाहत राहिला,
ज्ञानाचा अभिमान त्याचा राधेपाशी लोप झाला।

'जयश्री' म्हणे भक्ती अशी दुर्मीळ त्रिभुवनामध्ये,
राधेंच्या प्रेमामधुनी भक्तच भगवान झाला॥

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

जाहिरात..

गणेश पावतो नवसा
मंडळे करी जाहिरात
भक्तमंडळी रे सक्रिय
गर्दी वाढवी रातोरात

विश्वास ठेवी भाविक
उस्फुर्त भावनाभरात
ओघ इथला वाढावा
असो ईश्वर चराचरात

सेलिब्रिटीनाबोलवावे
नेत्यांची काढा वरात
फटाफट पावती फाटे
देणग्यांचे ओघजोरात

नारळ तोरण बांधावे
विक्रमी विक्री हारात
सोने नाणी भेटी वस्तु
फळे मिठायात खैरात

व्यवसाय ते तेजीमध्ये
लक्ष्मीअवतरते दारात
भाव घे अव्वाचे सव्वा
बार्गेनिंग ना करे दरात

मिडीयाला करे तैनात
लोण पसरो क्षणार्धात
नास्तिकहोई आस्तिक
माणूसपिचला स्पर्धात

विघ्नहर येई मदतीस
नाम घ्या जरी मनात
सावली रे पायाखाली
कशासकष्टता उन्हात

समुपदेश..

महोत्सव हा सर्वांचा
असो गरीब वा नरेश
काही ना आडकाठी
सर्वांना समुक्त प्रवेश

विचार पूर्वक घातले
पाळावेनियमआदेश
उत्सव रे पावित्र्याचा
उचित जावा सन्देश

प्रतिष्ठा लावे पणाला
निष्ठा करतात निवेश
कसे करी आयोजन
असते महत्व विशेष

नकोकायदे उल्लंघन
न ओलांडेलक्ष्मणरेष
महाउत्साह उत्सवात
आवरावे अतिआवेश

डिजे वाजे कर्कशते
होतात अत्यंत क्लेष
पडदे फाडत कानाचे
निर्लज्जते न लवलेष

विशिष्ट धर्मजमातीस
सततकरतात उपदेश
नियमपालनसर्वास्तव
आवश्यक रेसमुपदेश

कुणीतरी करी प्रमाद
लयास जातो मुलोद्देश
मनातून उमलो प्रेरणा
पुरेसा नसतो रे आदेश

- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996...



सुखदूःखाचे मोजमाप

जीवनी कसे जगायचे माणसाला कळेना
सुखाचे गणित त्याला समजता समजेना
धडपड करतो सदैव सुखाच्या शोधासाठी
म्हणूनी आटापिटा करतो फक्त पैशांसाठी

समाधान कशात असते त्यालाही कळेना!
धन,वित्ताचा शोध त्याचा थांबता थांबेना!
ओरबाडून दुस-यांचे सुख कधी ना मिळते
त्यासाठी,मनाचे मोठेपण हो!असावे लागते

माणसा!सुख कधीही न विकत मिळत असतं
दुःख न मागताही रे!तव पदरात पडत असतं
सुखदूःखाची समजुन घे माणसा!तू ही कथा
मग,दूर होतील तव जीवनाच्या सा-या व्यथा

जमली ना तुज कधिही जीवन जगण्याची रीत
फक्त जमविलीस जीवनी अमाप पैशांची रीत
मनुष्यजन्माचा अर्थ तुजला कधीही न कळला
अमुल्य जीवनाचा सारा जन्म तुझा व्यर्थ गेला!

माणसा! सुखदूःखाचे नसते कधीही मोजमाप
कधी कळणार सांग! अमुल्य जीवनी तुजला!
घालशील लगाम जेव्हा,तुझ्या अतिमोही मनाला
तेव्हा,खरे सुखसमाधान जीवनी लाभेल तुजला

काव्यरचनाः
मधुकर निलेगांवकर, पुणे
९४२१३७६६११

गौराईची आरती

१
गौराई आली हो आमुच्या दारी
नीरक्षिर शिंपुनी स्वागत मी करी
कुंकुम पावले फिरती घरी
समृद्धीचा वसा घेऊन करी.
जय देवी जय देवी. ॥१॥

जय देवी जय देवी गौराईमाते
साकार-सगुणात्मक मूर्ति मी पुजते,
जय देवी जय देवी ॥ध्रु॥

२
श्रावण-भाद्रव्याचे फुलपत्री मखर
बरसते जीवनदायी संततधार
नटली वसुंधरा नित्यनुतन
तुझ्याकरता रचली पूजा सुंदर.
जय देवी जय देवी.
जय देवी जय देवी गौराईमाते...॥२॥

३
ये गं गौराई, बस पाटावरी
लेवुन रेशमवस्त्रे, काठाला जरी
खडे, मुखवटे, साने, तेरडे
रूपांची वैविध्य तुझीच सारी.
जय देवी जय देवी.
जय देवी जय देवी गौराईमाते...॥३॥

४
पुरणावरणाचा केला स्वयंपाक
घरात गोकुळ झाले, जमले गणगोत
गोडाधोडाचे भोजन करी
मांगल्य दुःखाला बाजूला सारी.
जय देवी जय देवी.
जय देवी जय देवी गौराईमाते...॥४॥

५
ज्ञानविज्ञानाचा सगळा पसारा
तंत्राने भरला भवताल सारा
चंद्रमंगळयाने अवकाशी फिरती
तरी तुझी गं माते करतो आरती.
जय देवी जय देवी.
जय देवी जय देवी गौराईमाते...॥५॥

६
नास्तिक बुद्धी तरिही आस्तिक मन
याला जीवन ऐसे नामाभिधान
निर्मोही रुपात तू निराकार
आनंदी जगण्याचे एक समाधान.
जय देवी जय देवी.
जय देवी जय देवी गौराईमाते...॥६॥

© डां. निर्मोही फडके. ठाणे

॥ जय देव जय देव ॥ जय मंगलमूर्ती

धृ
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
आनंदे उल्हासे करू या आरती
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ॥ धृ ॥

1
चिंताग्रस्त भक्त झाले धरतीवरती
सुखकर्ता दुखहर्ता जगती हो किर्ती
संकटातुनी करा हो सकलांची मुक्ती
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ॥ १ ॥

2
तव चरणी भक्तजन प्रार्थना करिती
संकटकाळी रक्षावे हो मंगलमूर्ती
साकडे घालितो करा तुम्ही पूर्ती
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ॥ २ ॥

3
कामनापूर्ती करावी हो मंगलमूर्ती
भक्त मनोमनी संतोष हो पावती
कवी अरुणदास म्हणे करू आरती
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ॥ ३ ॥

4
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
आनंदे उल्हासे करू या आरती
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ॥ धृ ॥

कवी-अरुणदास
अरुण वि.देशपांडे - पुणे
9850177342

गौराई

आली गौराई गौराई
तिला नटवा सजवा
दुर्वा आघाडा फुलांनी
सण गौरीचा गाजवा

सडा रांगोळी अंगणी
सप्तरंगी ती आरास
शोभा वाढवू घराची
बांधू तोरण दारास

लेकी आल्या माहेराला
लाड पुरवू तयांचे
साडी चोळी नी बांगडी
ताट पंचपक्वनाचे

दारी कुंकवाचे ठसे
कोण आले कोण आले
सोनियाच्या पावलांनी
माझ्या गौरीची पाऊले

सारा आनंदी आनंद
घरी सोहळे देखणे
गाऊ आरती कौतुके
घेऊ थाटात उखाणे.

©®
सौ.रचना गि. वसेकर

मोदक रे मोदका

मोदक रे मोदका, गोड गोड मोदका,
गणरायाच्या आवडीचा तू मोदका! ॥धृ॥

गुळ-खोबऱ्याचा गोड भरणा,
सुगंध तुझा भारी ना!
उकडीचे ते शुभ्र आवरण,
खाता मिळे आनंदघन! ॥१॥

मोदक रे मोदका, गोड गोड मोदका,
गणरायाच्या आवडीचा तू मोदका! ॥धृ॥

आईच्या हातची सुंदर कला,
आवडतो सर्व घराला।
नैवेद्यात तू पहिला मान,
तुझ्याविना अपुरा सण! ॥२॥

मोदक रे मोदका, गोड गोड मोदका,
गणरायाच्या आवडीचा तू मोदका! ॥धृ॥

बाप्पा म्हणती "खूपच छान",
तुझ्यामुळे वाढे मान।
लहान-मोठे सारे गाती,
मोदकाची गोड कहाणी! ॥३॥

मोदक रे मोदका, गोड गोड मोदका,
गणरायाच्या आवडीचा तू मोदका! ॥धृ॥

गणपती बाप्पा मोरया!

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

किती वाट पाहू तुझी

कुठे आहेस लपला,
आस ह्या मातीला तुझी.
पाठव रे पाणी देवा,
किती वाट पाहू तुझी.

थकला हा बळीराजा,
तरी मन स्थिर असे.
नाही दिली साथ जरी,
उपाशी कुणास ठेवत नसे.

मनी आस्था ही प्रचंड,
देवा तुझ्या ह्या भेटीची.
कष्ट करी वर्ष भरी,
वाट पाही ती वारीची.

डोळे उघड हे देवा,
आयुष्य संपत आले.
खेळ सुरू जन्म मृत्यू,
आता किती क्षण चाले.

भक्ती कर्म कार्य कष्ट,
मार्गावर साथ तुझी.
का भेटे अखेर क्षणी,
किती वाट पाहू तुझी.

- तुषार राजेश लाखे.
- वरोरा जिल्हा चंद्रपूर.

बा विठुला.!!

बा विठ्ठला हरी। ग्रंथ आध्यात्मिक।
तो प्रातिनिधिक। जगाचिया।।

पुष्प समर्पित। लेखनी धार्मिक।
नाव अलौकीक। ग्रंथाचिया।।

असे भावस्पर्शी। मनी अनुभूती।
धन्य झाली मती। देखोनिया।।

भक्तीभाव निती। माउली चरणी।
अभंग वाहिनी। अर्पिलिया।।

शब्द सागराची। उत्स्फूर्त मनाची।
रचना कवींची। जाणोनिया।।

सवे कवितेंची। गोडी अभंगाची।
गाथा पंढरीची। पाहोनिया।।

श्री हरी कृपेने। भाग्यवंत अती।
समाधान चित्ती। वाटोनिया।।

साद बांधिलकी। शब्द सुमनांची।
हाक अंतरीची । विठूराया।।

प्रफुल्ल ठाकरे
अमरावती

॥ श्री गणेशाय नमः॥

पंचस्थान चिंतामणी

१
अष्टविनायकात असे पाचवे स्थान
पुण्यभूमी प्रांती थेऊर गावी असे
मूळा मुठा नदीतीरीकदंबवृक्षाखाली
पेशवेआराध्यदैवत चिंतामणी वसे

२
ब्रह्मदेवाची तपश्चर्या फळा आली
मनशांतीची आराधना सफल झाली
कपिलऋषींचेचिंतामणीरत्नपळवी
गुणासुर,गणेशाराधने प्राप्तीझाली

३
पूर्वाभिमुख असे मंदीरभक्तीचेस्थान
सुसंस्कृतिचा घडे इतिहास सुमंगल
शुभमांगल्याचा भाव मनी प्रार्थना
नित सदभावनेची ज्योतफुले सुज्वल

४
अभिजित ऐश्वर्यवान राजानिपुत्रिक
समृद्धी,वैभवात मनीअसेदुःखभारी
वैश्यम ऋषींचा उपदेशे गणेशसेवा
तपश्चर्याफल पुत्ररत्नप्राप्तीहर्षभारी

५
ऐसे दैवत स्वायंभू गणेश चिंतामणी
वामशुंड,नेत्रीहिरेचमकती रक्तवर्णी
चिंता,क्लेश दुःख सारे बाप्पाचरणी
भक्तजन होती निश्चिंन्त देवाशरणी

स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
Artist.



आभाळमाया

असतें एखादी अशीच कुठलीतरी आठवण,
असते केलेली मनाच्या कोपऱ्यात साठवण.
असतो एखादा चुकलेला कयास,
असतो व्यर्थ कोणाचातरी प्रयास.
असतें कधितरी पल्लवित झालेली आशा,
असते उगाचच पदरी पडलेली निराशा.
असतो बाळगलेला मनोमनी आशेचा किरण,
असतो त्रास होत जिवाला, जड होता अंतःकरण.
असते एखादी गोष्ट ओठांवर येऊन थांबलेली,
असतें मनात पक्की खुणगाठ बांधलेली.
असतों दूरवर चमचमत अढळपणें धुवतारा,
असतो पहाटेपर्यत लुकलुकत शुक्रतारा.
असतें केलेली हळूवार क्षणांची अलवार ज़पणुक,
असतें सलत मनामध्ये ती अपमानास्पद वागणूक.
असतो एखादा सल मनात खोलवर रूजलेला,
असतो कधितरी अंदाज सपशेल फसलेला.
असतें एखादी ठेच अनपेक्षितपणें लागलेली,
असतें खुणगाठ मनात पक्की बांधलेली.
असतो झालेला कधितरी रंगाचा बेरंग,
असतो अंतर्बाह्य ढवळून निघालेला अंतरंग.
असतें हदयात हळूवार जपलेली अपार माया,
असतें साठवलेली मनात विशाल अशी आभाळमाया.

©शेखर देशपांडे



दर्जा राज्य भाषेचा मिळाला

बुलंद झाला आवाज

आज मराठी भाषेचा
प्राप्त होई दर्जा तीला
अभिजात राज्य भाषेचा ॥ १ ॥

केंद्र सरकारकडे महाराष्ट्राचा
झाला सतत पाठपुरावा
दृढ विचार होई केंद्र सरकारचा
दिला दर्जा मराठी भाषेला ॥ २ ॥

आनंद द्विगुणीत झाला
महाराष्ट्रीयन जनतेचा
आशा पल्लवित झाल्या
मराठी भाषेच्या सन्मानाने ॥ ३ ॥

जिम्मेदारी महाराष्ट्र सरकारची
भाषेचा विकास सहर्ष करण्याची
नको दिरंगाई योजना करण्याची
पाहू नका वाट पुन्हा आंदोलनाची॥ ४ ॥

आर.पी. दुसे
छ. संभाजीनगर
9422202747.

प्रिय आमची शाळा

प्रिय आमची शाळा
वाटते खूप छान
ज्ञानामृत पिऊनी
गातो आम्ही गुणगान

इतिहास डोकावून पाहता
शूरविरांचे होते स्मरण
मातृभूमीच्या रक्षणासाठी
स्विकारले त्यांनी मरण

ग्रह ताऱ्यांचा अभ्यास
शिकविते भूगोल
कथा कवितेतून उमलते
शब्दांचे मोल

माणवि उत्क्रांती करीता
झेप घेतली विज्ञानाने
नवतंत्राचा संदेश देत
काम सुलभ केले संगणकाने

गुरूजनांचे मार्गदर्शन होता
शिस्तीने फुलते तनमन
प्रिय वाटते आमची शाळा
इथेच घडते जीवन

- रवींद्र चानीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

प्राजक्ताची फुले

कवी पाडगावकर

ग्रंथा प्राजक्ताची फुले
तालावर गाणे गात
नाचायचो आम्ही मुले..(१)

मृदु सुगंधी,नाजूक
फुले ही मनमोहक
औषधाने परिपूर्ण
खरा संस्कृती वाहक..(२)

देव आणि दानवांनी
केले समुद्रमंथन
एक रत्न,कल्पवृक्ष
असे ग्रंथात कथन..(३)

सत्यभामा करी हट्ट
हवा प्राजक्त मजला
स्वर्गातून पृथ्वीवर
भेट कृष्णाची तिजला..(४)

सडा पडे प्राजक्ताचा
करा अर्पण देवास
सुख,शांती व समृद्धी
मिळे चैतन्य घरास..(५)

जगा प्राजक्ता समान
नाते मातीशी जुळून
सेवा,भक्ती,शुद्धप्रेम
पहा जरासे बळून..(६)

अरविंद कुळकर्णी
छत्रपती संभाजीनगर
भ्रमण ९८२२६४२२९४

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559